D:\Yogesh\T - 11\Unnat Bharat Abhiyan\LetterHead UBA.doc

सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

दिनांक :- २६/१२/२०१६

क्र. सामान्य/क-४/टे-११/उ.भा.अ./बा.को.क्र.F१४५८११५११७९३३

प्रति,

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, ठाणे
तथा ठाणे जिल्हा नोडल अधिकारी उन्नत भारत अभियान

२. प्राचार्य, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,
भारतीय विद्या भवन्स कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५८

३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई
४९, खेरवाडी, ए.वाय.जंग मार्ग, वांद्रे (पु.), मुंबई - ४०० ०५१

४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे
भारत गिअर लि. च्या विरुद्ध बाजूस, फडके पाडा, मुंब्रा, ठाणे - ४०० ६१२

**विषय : उन्नत भारत अभियान**
**दि. २६/१२/२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त**

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात उन्नत भारत अभियान राबविण्याबाबत दि.२६/१२/२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी या सोबत जोडून पाठवित आहे.

तरी सदर बैठकीत दिलेल्या सूचनांची पूर्तता करून आपला अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

**प्रत** - मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ / २५३४ १७३७ / ३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

## ठाणे जिल्ह्यात उन्नत भारत अभियान राबविणेबाबत दि.२६/१२/२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त

**बैठक दिनांक २६ डिसेंबर, २०१६** **वेळ - दुपारी १२.०० वा.**

भारत सरकारच्या मानव संसाधन आणि विकास मंत्रालयाने ग्रामीण भागातील विकास प्रक्रियेचा कायापालट करण्याच्या दृष्टीने उच्चशिक्षण संस्थांच्या मदतीने सर्वसमावेशक भारत निर्माण करण्याच्या उद्देशाने **उन्नत भारत अभियानाची** सुरुवात केली आहे. उच्चशिक्षण संस्थांना स्थानिक समुदायाशी जोडून तंत्रज्ञान विषयक शोधांच्या सहाय्याने ग्रामीण भारतात विकासात्मक बदल करणे ही **उन्नत भारत अभियान** राबविण्यामागची कल्पना आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात **उन्नत भारत अभियान** राबविण्याबाबत आढावा घेण्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

मा. जिल्हाधिकारी हे अन्य प्रशासकीय कामामध्ये व्यस्त असल्याने उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांचे अध्यक्षतेखाली समिती सभागृह, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे सदर बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे अधिकारी / पदाधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासननिर्णय क्रमांक - धोरण३०११/(४५/१६)/ तांशि-२, दि.१५/०६/२०१६ मधील तरतूदींनमूद करून ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दैनंदिन गरजा पुर्ण करण्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण भागाचा विकास करून उन्नत भारत अभियान यशस्वीपणे राबविण्याबाबत बैठकीचा उद्देश विशद केला. बैठकीत झालेली चर्चा व देण्यात आलेल्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बैठकीतील विषय | झालेली चर्चा | दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १. | गावांची निवड करणे | उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी उपस्थित जिल्हा परिषद प्रतिनिधी तसेच अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेत संस्थाचे प्रतिनिधी यांना उन्नत भारत राबविण्यासाठी गावांची निवड कशी करता येईल याबाबत विचारणा केली. त्यावर शासकिय तंत्रनिकेतन, मुंबई या संस्थेच्या प्रतिनिधी यांनी बाजारपेठ असलेल्या गावाची | दि.३०/१२/२०१६ पर्यंत **उन्नत भारत अभियाना** साठी ३ ते ६ गावांची निवड करून त्या गावांच्या ग्रामपंचायत डेव्हलपमेंट प्लॅन (GPDP) च्या सॉफ्ट कॉपी सह जिल्हाधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, ठाणे तथा ठाणे जिल्हा नोडल अधिकारी उन्नत भारत अभियान |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | निवड केल्यास जास्त फायदेशीर ठरेल असे सांगितले.<br>अभियानाच्या पहिल्या टप्प्यात ७५० - १००० लोकसंख्येचे गाव निवडल्यास अभियान राबविणे जास्त सोईचे होईल अशी सूचना उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी केली.<br>प्रकल्पाची विषय निश्चित करणे, प्रोजेक्ट तयार करणे व त्यावर निर्णय घेणे साईचे व्हावे या दृष्टीने शासनाने ठाणे जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या १.सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, २.शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई, ३.शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे या तीन संस्थांसाठी तीन ते सहा गावांची निवड करण्यात यावी, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी सुचित केले. तसचे गाव निवडीसाठी जिल्हा परिषदेने तयार केलेल्या ग्रामपंचायत डेव्हलपमेंट प्लॅन (GPDP) ची मदत घेण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी दिल्या. | कार्यालयास लेखी अहवाल सादर करावा. | |
| २. | निवड करण्यात आलेल्या गावांचा सर्व्हे करणे | जिल्हा परिषदेकडून गावांची निवड करून झाल्यानंतर शासनाने ठाणे जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या ३ समन्वयक संस्थांनी अभियांत्रिकी विद्यार्थी व शिक्षकांचे एक पथक तयार करून संबंधित गावातील गरजांबाबत आभ्यास (सर्व्हे) करावा असे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी सांगितले.<br>त्यास समन्वयक संस्थांच्या उपस्थित प्रतिनिधींनी सहमती दर्शविली. | गावांची नावे निश्चित झाल्यानंतर १ आठवड्याच्या आत समन्वयक संस्थांनी त्यांना नेमूद दिलेल्या गावाचा सर्व्हे करावा. | १.सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, बांद्रा<br>२.शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई,<br>३.शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | विषयाची निवड करणे | उन्नत भारत अभियान व उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रोजेक्टसाठी शासनाने निश्चित केलेल्या विषय उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी वाचून दाखविले. तसेच निवड करण्यात आलेल्या गावांमधील गरजेनुसार १. पेयजल, २.ग्रामीण वीजपुरवठा, ३.शहरी वीज पुरवठा आणि पाणी, ४.सार्वजनिक वाहतूक, ५.संसाधने, ६.सिंचन, ७.ग्रामीण उद्योग, ८.स्वच्छता, ९.कुकींग एनर्जी यांपैकी एका विषयाची निवड करावी, असे त्यांनी सांगितले. | केलेल्या सर्व्हेच्या आधारावर तसेच आपले तांत्रिक ज्ञानाचा वापर करून गावांच्या गरजांनुसार विषयाची निवड करणे | १.सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, बांद्रा<br>२.शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई,<br>३.शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| ४ | निवडलेल्या विषयावर तयार करण्यात येणाऱ्या प्रोजेक्टचे सादरीकरण तयार करणे | समन्वयक संस्थांनी निवडलेल्या विषयावर विद्यार्थ्यांना प्रश्नावली व सादरीकरण तयार करण्याच्या सुचना द्याव्यात, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी सांगितले. तसेच सदर प्रोजेक्टची निवड करण्यासाठी प्रोजेक्टची मूलभूत संकल्पना, त्यासाठी ज्या विभागाची मदत आवश्यक आहे ते विभाग, प्रोजेक्टसाठी लागणारा कालावधी, अपेक्षित खर्च, लाभार्थी लोकसंख्या, होणारा फायदा इ. बाबत सविस्तर | निवडलेल्या विषयावर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कशाप्रकारे मदत करता येईल याबाबत प्रोजेक्ट तयार करून त्याचे सविस्तर सादरीकरण तयार करणे. | १.सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, बांद्रा<br>२.शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई,<br>३.शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अहवाल तयार करून त्याचे सादरीकरण पुढील बैठकीत करण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी दिल्या. | | |
| ५ | निधी उपलब्धता | सदर प्रोजेक्टच्या पूर्वतयारीसाठी तसेच प्रत्यक्ष प्रोजेक्टसाठी लागणारा खर्च कशातून करण्यात येईल याबाबत समन्वयक संस्थांच्या प्रतिनिधींनी विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेल्या जिल्हा नियोजन निधी, विविध खाजगी संस्थांचे CSR फंड, तसेच इतर विभागांकडील निधी यामधून याबाबतचा खर्च करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी महोदय निर्णय घेतील असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी सांगितले. | - | - |

वरील प्रमाणे बैठकीत चर्चा होऊन संबंधित यंत्रणेस आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. त्यानंतर उपस्थितांचे आभार मानण्यात येवून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे**

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ / २५३४ १७३७ / ३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in